# प्रेसनोट दि.१९/०३/२०१९

## बिबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर

दि.१६/०३/२०१९ रोजी बिबवेवाडी पोलीस ठाणेचे तपास पथकातील अधिकारी श्री काळे पोलीस उप निरीक्षक व स्टाफ असे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस शिपाई चव्हाण यांना त्यांच्या खास बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, अप्पर पाण्याच्या टाकीजवळ ,एक अनोळखी इसम त्याचे हातात कोयता असुन तो सुप्पर मारुती मंदीरा समोर दहशत करण्याचे उद्देशाने आरडा ओरडाकरत आहे. अशी खात्रीशिर माहिती मिळाली असता वरिल स्टाफने सदर ठिकाणी जावुन खात्री करता तेथील उभे असलेल्या इसमा जवळ जाताच तो सैरावैरा पळुन जात असल्याने त्यास थोडया अंतरावर जावुन पकडले असता त्याच्या जवळुन एक कोयता जप्त करुन त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव मंगेश शंताराम बोराडे,वय-१९,रा.अप्पर सुप्पर इंदिरानगर,माताजी ट्रेडर्स,बिबवेवाडी,पुणे असे सांगितल्याने त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याचे विरुध्द बिबवेवाडी पोलीस ठाणे गु.र.नं.९६/२०१९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) १३५, आर्म ॲक्ट कलम ४(२५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक,काळे, हवालदार चिप्पा, पोलीस शिपाई शिंदे व अप्पर बिट मार्शलचे पोशि .भोसले, पोशि.यादव यांनी केली आहे.